
# Aayushi International Interdisciplinary Research Journal

Impact Factor
5.707

[ ISSN 2349-638X ]
PEER REVIEW JOURNAL
(+91) 9922455749 | (+91) 8999250451


MENU






JOURNAL FINDER

TODAY

| | | |
|---|---|---|
| Janardhan Jadhav | Gaganbawda Jahagiritil Shaikshnik Paristithi ek Drashtikon | (uploads/Articles/2018/06/3320_26.Janardhan Jadhav.pdf) |
| Prakash Rathod & Dr. S. B. Jadhav | Spatio-Temporal Study Of Sex Ratioin Frontier Between Andhra Pradesh, Karnataka And Maharashtra | (uploads/Articles/2018/07/3325_27.Mr. Prakash Rathod & Dr. S. B. Jadhav.pdf) |
| Dr.Padma Mohanrao Jadhav | Manshantisathi Bhagwatgeeta | (uploads/Articles/2018/09/3449_35.Dr.Padma Jadhav.pdf) |
| Dr.Gajanan Jadhav | Shahiri Kawyatil Updesh | (uploads/Articles/2018/12/3524_37.Gajanan Jadhav.pdf) |
| Dr.Padma Mohanrao Jadhav | Gunvattapurna Shikshak Prashikshnat Samajacha Sahabhag Adhyapak Vidyalyanchi Bhumika | (uploads/Articles/2018/12/3548_15.Dr.Padma Jadhav.pdf) |
| Dr. Sunil G. Jadhav | Vidvawo ke Darda ka Ahsas Karati Nirali ki Vidwa Kavita | (uploads/Articles/2019/01/3589_30.Dr.Sunil Jadhav.pdf) |
| Ashok Jadhav | Pandit Nehru Ani Dharmanirpekshta | (uploads/Articles/2019/01/3590_31.Ashok B Jadhav.pdf) |
| Dr. N.S. Jadhav | Tourism Issues and Impacts | (uploads/Articles/2019/02/3600_03.Dr. N.S. Jadhav.pdf) |
| Dr. N. S. Jadhav | Positive Health Suggestions to Ageing Population | (uploads/Articles/2019/03/3646_08.N.S.Jadhav.pdf) |
| Vitthal Jadhav | Mahavidyalayin Granthalayasathi E-Resource N List consortium | (uploads/Articles/2019/03/3677_38.Vitthal Jadahv.pdf) |

Name of Author

Disclaimer: Before sending the articles or research papers to Aayushi International Research Journal, authors must ensure about the authenticity of the work to be published. In case of plagiarism, inaccurate and misleading data, the authorities of the Journal will not be responsible for further action. It is the sole responsibility of the concerned author.

## About us

## Address for Correspondence:

## Contact us

certificate required

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# महाविद्यालयीन ग्रंथालयांसाठी ई - रिसोर्स : एन- लिस्ट कन्सोर्शिया

प्रा.विठ्ठल जाधव
ग्रंथपाल
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना :**

इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील वाचन साहित्याचा वाढता ओघ तसेच त्यांच्या वाढत्या किमती व ग्रंथालयांची अर्थिक चणचण यामुळे कोणतेही ग्रंथालय वाचन साहित्यांच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होऊ शकत नाही. यावर उपाययोजना म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने इन्फोरमेशन लायब्ररी नेटवर्क (INFLIBNET) ची स्थापना केली. तसेच सर्व विद्यापीठांना ई- संसाधन पुरविण्यासाठी २००४ मध्ये INFLIBNET व्दारे UGC-INFONET Digital Library Consortium ची स्थापना करण्यात आली. यामध्ये भारतातील विद्यापीठांना ई-संसाधने (E-Books/E-Journals) उपलब्ध करून देण्यात आली. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी २०१० मध्ये एन-लिस्ट कन्सोर्शियाची स्थापना करण्यात आली. ई-शोध सिंधू, इन्फिलबनेट, अे.आय.सी.टी.इ. कन्सोर्शिया, आयआयटी दिल्ली यांनी एकत्रीतपणे National Library and information Services Infrastructure for scholarly content (एन - लिस्ट) या प्रकल्पाची स्थापना १९९० रोजी अहमदाबाद येथे करण्यात आली. सध्या ते गांधीनगर येथे कार्यरत आहे. संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व प्राध्यापकांस एन- लिस्ट प्रकल्प वरदान ठरत आहे.

१. इन्फिलबनेट (INFLIBNET) :


देशातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन व विकास संस्था व इतर महत्त्वाच्या संस्थांची ग्रंथालये एकमेकांना जोडण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प युनिव्हर्सिटी ग्रॅंट्स् कमिशन या संस्थेने घेतला आहे. या नेटवर्कचे केंद्र गुजरात मधील गांधीनगर येथे आहे.

**१.१ इन्फिलबनेट ची (INFLIBNET) उद्दिष्टे :**

१. देशान्तर्गत ग्रंथालये आणि माहिती केंद्रांचे जाळे प्रस्थापित करणे व माहिती हाताळण्याच्या क्षमतेत वाढ करणे.
२. युनियन कॅलॉगच्या माध्यमाने पुस्तके व इतर साहित्याबद्दलची माहिती पुरविणे व ती मिळण्याची शक्यता निर्माण करणे. विस्तृत ग्रंथसंग्रह तयार करणे.
३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील डेटाबेस ऑनलाईन तत्त्वावर उपलब्ध करून देणे.
४. वेगवेगळया विषयांवर त्यात काम करणाऱ्या समृध्द संस्थेच्या मदतीने विस्तृत ग्रंथसंग्रह तयार करणे.
५. तालिकीकरण सहकार्य व आंतरग्रंथालयीन देवाणघेवाणीस प्रोत्साहन देणे.
६. ग्रंथालय संगणकीकरण करणे व त्यात एकजिनसीपणा आणून मानके तयार करणे.
७. शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, संशोधक, समाजशास्त्र शास्त्रज्ञ, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यात परस्पर सुसंवाद सेवा देणे.
८. ऑनलाईन पध्दतीवर माहिती- सेवा देणे.
९. ग्रंथालय - ग्रंथालय अंतर्गत सहकार्य वाढविणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

१०. ग्रंथालयाच्या संगणकीकरणात उपयुक्त अशी एकात्मिक संगणकप्रणाली बनविणे.




आकृती क्र.१. **इन्फिलबनेट वेबसाईट होम पेज.**

**२. एन- लिस्ट ची गरज :**

एन - लिस्ट या प्रकल्पाचे उद्‌घाटन इन्फिलबनेट व्दारे ०४ मे २०१० रोजी आपल्या देशाचे तत्कालीन मनुष्यबळ विकासमंत्री श्री.कपिल सिब्बल यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षणाच्या प्रसारामुळे शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, संशोधन संस्था, उद्योगधंदे यांच्या ग्रंथालयांची संख्या वाढत आहे. माहितीच्या झपाटयाने होणाऱ्या वाढीमुळे सर्व प्रकारच्या ग्रंथालयांना आधुनिक ज्ञानसांधनांचा जलद गतीने पुरवठा करणे अवघड झाले आहे. संशोधक तसेच इतर वाचकांना झपाटयाने बदलत असलेल्या ज्ञानसाधनांची निकड भासू लागली आहे. यासाठी लागणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी ग्रंथालयाकडे वाचकांची मागणी येवू लागल्याने यासाठी होणारा खर्च आणि ग्रंथालयाचे अंदाजपत्रक यांचा मेळ घालणे कठीण होऊ लागले आहे. यातूनच एन-लिस्ट सारख्या कन्सोर्शिया ची गरज निर्माण झाली.

**२.१ एन- लिस्ट ची उद्दिष्टये :**

- सर्व शैक्षणिक संस्थांना अद्ययावत व गुणात्मक माहिती पुरविणे.
- सर्व शैक्षणिक संस्थांकडून वर्गणी त्यांना दर्जात्मक ई- ग्रंथ आणि ई - नियतकालिके उपलब्ध करून देणे.
- डिजीटल माहितीची दरी कमी करणे आणि ज्ञानधिष्ठित समाजापर्यंत ज्ञान पुरविणे.




आकृती क्र.२. एन- लिस्ट वेबसाईट होम पेज

**२.२ एन- लिस्ट कन्सोर्शियाचे सभासदत्व :**

एन - लिस्ट चे सभासद होण्यासाठी महाविद्यालयाने काही जबाबदाऱ्या पूर्ण करावयाच्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेमार्फत १२b आणि २f चे निकष ज्या महाविद्यालयाने पूर्ण केले आहेत असे महाविद्यालय एन-लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यास पात्र आहेत. याशिवाय विनाअनुदानित महाविद्यालय सुध्दा एन-लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यास पात्र आहेत. १२(b) आणि २(f) चे निकष ज्या महाविद्यालयाने पूर्ण केले आहेत असे महाविद्यालय एन-लिस्ट कन्सोर्शियाचे सभासद होण्यासाठी वर्गणी रू.५०००/- व जीएसटी वेगळी असे रू.५९००/- तर विनाअनुदानित महाविद्यालयास सभासद होण्यासाठी रू.३००००/- व अधिकची जीएसटी असे एकूण रू.३५४००/- वार्षिक वर्गणी एप्रिल ते मार्च भरावी लागते.


**२.३ वर्गणी भरण्याची प्रकिया :**

वरील प्रमाणे दिलेली वार्षिक वर्गणी भरण्यासाठी INFLIBNET-NLIST या नावाने डिमांड

ड्राफ्ट काढावा लागतो.किंवा RTGS/NEFT द्वारे वर्गणी भरता येते. RTGS/NEFT चा पत्ता खालीलप्रमाणे.


**Mode of Payments**

1. Membership Fee shall be paid by Demand Draft drawn in favour of INFLIBNET-NLIST Account payable at Gandhinagar
   Or
2. Through RTGS/NEFT fund transfer to INFLIBNET-NLIST Account as per the details provided below :
   Beneficiary Name : INFLIBNET - NLIST A/c.
   Bank Name : State Bank of India
   Branch : Infocity, Gandhinagar
   Bank Address : Unit GWGF/2, Ground Floor, Infocity,
   Gandhinagar, Gujarat
   Bank Account No. : 31104082931
   IFSC Code : SBIN0012700
   MICR Code : 380002151



आकृती क्र.३. एन- लिस्ट वर्गणी भरण्याबाबतची माहिती.


वर्गणी भरल्यानंतर एन -लिस्टच्या संकेतस्थळावरून महाविद्यालयाने जमा केलेल्या नोंदणी शुल्काची पावती बनवून देणे. त्यानंतर सर्व अधिकार Technical Assistance ला दिल्याचे मा. प्राचार्यांचे पत्र ऑनलाईन अथवा ऑफलाईन एन -लिस्ट ला पाठविणे. शक्यतो Technical Assistance हा ग्रंथपाल असावा. कॉलेज ॲडमिनमार्फत आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच संशोधक विद्यार्थ्यांना युजरनेम आणि पासवर्ड दिला जातो.



आकृती क्र.४. कॉलेज ॲडमिन होम पेज.

**३. उपलब्ध ई - संशाधने :**

एन लिस्ट कन्सोर्शियामध्ये ३१,३५,००० पेक्षा जास्त ई - बुक्स आणि ६,००० पेक्षा जास्त ई -जर्नन्स ऑनलाईन वाचता येतात. दि.०२मार्च २०१९ पर्यंत एकूण ६०२७ इतकी महाविद्यालये एन लिस्ट कन्सोशिर्याचे सभासद असून एकूण यूजर्स ६०५३६५ एवढे आहेत.



आकृती क्र.५.उपलब्ध असलेली ई संधासने

### Resources Available under NLIST Programme


| Electronic Journals and bibliographic Database | | | | |
|---|---|---|---|---|
| Sl. No. | E-resources / Publishers of Electronic Journals | Publishing Country | No. of Journals | Backfiles from |
| 1 | American Institute of Physics | USA | 18 | Ten years |
| 2 | American Physical Society | USA | 10 | Ten years |
| 3 | Annual Reviews | USA | 33 | Ten years |
| 4 | Cambridge University Press | UK | 224 | Ten years |
| 5 | Economic and Political Weekly | India | 1 | 1966+ |
| 6 | Indian Journals.com | India | 186 | 2007+ |
| 7 | Institute of Physics (UK) | UK | 46 | Vol. 1+ |
| 8 | Oxford University Press | UK | 206 | 1996+ |
| 9 | Royal Society of Chemistry | UK | 29 | Ten years |
| 10 | Wilson Omnifile | USA | 3075 | 1982+ |
| 11 | MathSciNet | USA | 1 | 1940+ |
| | Total | | 3828 | |

| Electronic Books | | | | |
|---|---|---|---|---|
| Sl. No. | E-resources / Publishers of Electronic Books | Publishing Country | No. of Books | No. of Publishers |
| 12 | Cambridge Books Online | UK | 1000+ | 1 |
| 13 | E-brary | USA | 70000+ | 250 |
| 14 | Hindustan Book Agency | India | 65+ | 1 |
| 15 | Institute of South East Asian Studies(ISEAS) Books | India | 382 | 1 |
| 16 | Myilibrary-McGraw Hill | USA | 1124 | 1 |
| 17 | Net Library (Books purchased) | USA | 936 | 44 |
| 18 | Net Library (Books in open access) | USA | 3500 | 1 |
| 19 | Oxford Scholarship | UK | 902 | 1 |
| 20 | Springer eBooks | Germany | 1500+ | 1 |
| 21 | Taylor and Francis E-books | UK | 1000+ | 1 |
| | Total | | 80409 | |

## ४. एन. लिस्ट मधील ई- संसाधने शोधणे :


एन-लिस्ट कन्सोर्शियामधील ई - ग्रंथ आणि ई - नियकालिके शोधण्यासाठी प्रथम http://nlist.inflibnet.ac.in/ या संकेतस्थळावर जावे. त्यानंतर लॉगीन पर्यायामधील आपला वैयक्तिक युजरनेम आणि पासवर्ड टाकावा. आपणास हवे असणाऱ्या ई - संसाधनावरील मजकूर सर्च करा किंवा डाऊनलोड करून घ्या.

### 4-1 एन लिस्ट कन्सोर्शियामध्ये लॉगीन :





आकृती क्र.५.एन लिस्ट कन्सोर्शियामध्ये लॉगीन

### 4-2 ई- स्त्रोत प्रवेश :





आकृती क्र.६.एन लिस्ट कन्सोर्शियामध्ये ई-संसाधन शोधणे

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x




आकृती क्र.७.एन लिस्ट कन्सोर्शियामध्ये ई- जर्नल शोधणे

Click on [x] button on your browser to logout.




आकृती क्र.८.एन लिस्ट कन्सोर्शियामधून बाहेर पडणे.

**५. एन लिस्ट कन्सोर्शियाचे फायदे :**

- कमीतकमी दरात जास्तीत जास्त ई - संसाधने ऑनलाईन वाचता येतात, चाळता येतात तसेच जतन करून ठेवता येतात.
- माहिती संप्रेशन तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी एन - लिस्ट कन्सोर्शिया महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.
- २४ तास जगात कोठेही कधीही कोणत्याही वेळात एन लिस्ट कन्सोर्शिया ऑनलाईन वाचता येतात.
- संशोधकांना अद्ययावत माहिती मिळते.
- छापील नियतकालिकांपेक्षा संकेतस्थळावर अंक लवकर उपलब्ध होतात.
- एन-लिस्ट कन्सोर्शियामध्ये नामांकित आणि इम्पॅक्ट फॅक्टर असलेले ई - जर्नल्स उपलब्ध आहेत.

६. एन लिस्ट कन्सोर्शियाच्या मर्यादा :

- ई-बुक्स डाऊनलोड करण्याची प्रक्रिया सुलभ नाही.
- प्रादेशिक भाषेतील ई -संशाधने उपलब्ध नाहीत.
- आवश्यक त्या वेळेस प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही.
- विज्ञान शाखेच्या तुलनेत इतर शाखेची ई - संशाधने अपुरी असल्याचे निदर्शनास येते.

**समारोप :**

२१ व्या शतकामध्ये तंत्रज्ञानाच्या जोरावर उच्च शिक्षणामध्ये मोठे बदल घडत आहेत. त्यामुळे ग्रंथालयाची भूमिका ही महत्त्वपूर्ण ठरत आहे. एन-लिस्ट सुविधा महाविद्यालयीन वाचकांसाठी व संशोधकांसाठी वरदान ठरलेली आहे. कारण रू. ५९००/- मध्ये आणि कमीत कमी पयाभूत सुविधामध्ये महाविद्यालयांना एन-लिस्ट प्रोग्राम उपलब्ध करून देण्यात आला आहे. अनेक महाविद्यालये या प्रोग्रामची सभासद आहेत ही परंतू महाविद्यालयामध्ये एन लिस्ट प्रोग्रामचा वापर अधिक प्रमाणात होताना दिसत नाही. यासाठी प्राध्यापक तसेच संशोधक विद्यार्थी यांना प्रशिक्षण

देणे तसेच एन- लिस्ट वापर करण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१) फडके द.ना.: ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन : २०१५

२)पवार एस.पी. आणि इतर : ग्रंथालय व माहितीशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन, २००५

३)करमरकर, प्रकाश : ग्रंथालयीन संदर्भसेवा, पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन, २०१२

४) ज्ञानगंगोत्री : सप्टेंबर २०१६ ते नोव्हेंबर २०१६

**Websites :-**

1. https://www.inflibnet.ac.in
2. http://nlist.inflibnet.ac.in/
3. https://www.youtube.com/watch?v=BOCgzCfNbdE
4. https://www.youtube.com/watch?v=fkSSzlrw2wk&t=188s